महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA
पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे 67
COMMISSIONERATE OF ANIMAL HUSBANDRY
स्पायसर मेमोरिअल कॉलेज समोर, औंध, पुणे 411 067 Maharashtra State, Opposite Spicer Memorial College,Aundh,Pune 411067
E-Mail : cah.estt.nongazetted@gmail.com Telephone No.-020-25690460 Extn. 205

---

जा. क्र. एनजीओ 5/(भरती 2022)/प्र.क्र.1205/859/2024, पसं 01, पुणे-67, दिनांक – 13/12/24

प्रति,

मा.उपसचिव ( पदु )
महाराष्ट्र शासन,
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास
व मत्स्य व्यवसाय विभाग
मंत्रालय मुंबई- 400032

विषय : - पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभागाची पुनर्रचना व आकृतीबंधाबाबत...
संदर्भ :- 1. शासन निर्णय क्र. पसंप्र- 2024/प्र.क्र.01/ पदुम-1, दि.10.10.2024

उपरोक्त विषयानुसार आपणास सादर करण्यात येते की, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभागाची पुनर्रचना व आकृतीबंधाबाबतचा शासन निर्णय दि.10/10/2024 रोजी निर्गमित झालेला आहे. सदरच्या शासन निर्णयामधील परिशिष्ठ-7 प्रमाणे पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभागातील लिपीक संवर्गातील अधिक्षक या सवर्गाची 115 पदे, वरिष्ठ लिपीक या सवर्गातील 261 पदे निरसीत करण्यात आलेली आहेत. तसेच वर्ग-4 संवर्गातील शिपाइ/ परिचर संवर्गातील 1286 पदे मृत घोषीत करण्यात आलेली आहेत.सदर पदांबाबत त्या पदांवर कार्यरत कर्मचा-यांना अधिसंख्य गणण्यात यावेत. सदर पदावर कार्यरत कर्मचा-यांचे विभागामधील उपलब्ध पदांवर समावेशन करण्याच्या अनुषंगाने वित्त् विभागाचे दि.10/09/2001 च्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात यावी असे नमुद केलेले आहे.

त्या अनुषंगाने पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभागाची पुनर्रचना व आकृतीबंधाबाबतचा शासन निर्णय निर्गमित होण्याच्या दिनांकापुर्वी शासन/ खातेस्तरावरुन अधिक्षक (गट-क) यांना प्रशासन अधिकारी (गट-ब) या पदावर , वरिष्ठ लिपीक (गट-क) यांना वरिष्ठ सहाय्यक ( गट-क ) या पदावर वरिष्ठ लिपीक (गट-क) यांना लघुलेखक निम्नश्रेणी ( गट-क ) या पदावर तसेच वर्ग-4 संवर्गातील कर्मचा-याना त्याच पात्रतनुसार लिपीक टंकलेखक (गट-क) व पशुधन पर्यवेक्षक (गट-क) या पदावर पदोन्नती देणेबाबतची कार्यवाही सुरु केलेला आहे. परंतु पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभागाची पुनर्रचना व आकृतीबंधाबाबतचा शासन निर्णय दि.10/10./2024 नुसार उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे अनुक्रमे अधिक्षक, वरिष्ठ लिपीक ही पदे निरसीत केलेली आहेत तसेच शिपाई/ परिचर ही पदे मृत संवर्ग घोषीत केलेली आहेत. त्यामुळे वरील नमुद केलेल्या पदांची पदोन्नतीबाबतची कार्यवाही खातेस्तरावरुन ठप्प झालेली आहे. त्या अनुषंगाने उपरोक्त नमुद संवर्गातील कार्यरत कर्मचा-यांनी त्यांना अधिसंख्य न ठरावता उपलब्ध पदांवर पदोन्नती देऊन पशुसंवर्धन विभागातच कार्यरत ठेवणेबाबत विनंतीवजा निवेदणे सादर केलेली आहेत.

सद्यास्थितीत सुधारीत आकृतीबंधानुसार पशुसंवर्धन विभागातील अधिक्षक या सवर्गातील एकुण कार्यरत 24 कर्मचारी व वरिष्ठ लिपीक या संवर्गातील एकुण कार्यरत 127 कर्मचारी अधिसंख्य ठरलेले

आहेत. तसेच परिचर/शिपाई या संवर्गातील कार्यरत एकुण 468 कर्मचारी मृत संवर्ग घोषीत केलेले आहेत.तथापी उपरोक्त नमुद केलेल्या कर्मचा-यांची पशुसंवर्धन विभागातील शासकिय सेवेचा कालावधी हा सरासरी 15 वर्षापेक्षा जास्त झालेला आहे. त्या अनुषंगाने सदर कर्मचारी यांचा पशुसंवर्धन विभागातील प्रशासकिय, लेखा व आस्थापना कामकाजाचा अनुभव प्रदिर्घ असुन सदर कर्मचारी हे प्रशासकिय, लेखा व आस्थापना विषयक कामकाजात पारंगत असुन ते याबाबतीत कुशल झालेले आहेत. तसेच सुधारीत आकृतीबंधानुसार एकुण मंजुर पदसंख्या 12222 इतकी असुन त्यासंबधी प्रशासकिय, लेखा व आस्थापना विषयक कामकाज पाहणेसाठी लिपीक वर्गिय संवर्गातील एकुण मंजुर पदसंख्या 647 इतकी आहे. परंतु लिपीक संवर्गातील मंजुर पदसंख्येमधील रिक्त पदांची संख्या मोठया प्रमाणात असल्यामुळे लेखा व आस्थापना विषयक कामकाजावर यांचा प्रभाव मोठया प्रमाणात होऊ शकतो. तसेच पशुधन पर्यवेक्षक संवर्गाची सुधारीत आकृतीबंधानुसार एकुण 3772 पदे मंजुर केलेला असुन प्रत्यक्षात पशुधन पर्यवेक्षक या संवर्गात एकुण 362 कर्मचारी कार्यरत आहेत त्यामुळे उपरोक्त नमुद केलेल्या कर्मचा-यांची पशुसंवर्धन विभागास अत्यंत आवश्यकता आहे. त्याअनुषंगाने उपरोक्त नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांची पशुसंवर्धन विभागातील उपलब्ध पदांवर पदोन्नती करण्यात यावी अशी या कार्यालयाची धारणा आहे.

त्यानुसार अधिक्षक, वरिष्ठ लिपीक व परिचर/ शिपाई या पदावर कार्यरत कर्मचा-यांचे विभागामधील उपलब्ध पदांवर समावेशन करण्याच्या दृष्टने खालील प्रमाणे पदोन्नती बाबतची कार्यवाही करण्यास मंजुरीसाठी सविनय सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | संवर्ग | कार्यरत कर्मचारी संख्या | रकाना क्र.2 मधील संवर्गासाठी पदोन्नतीचा संवर्ग | सुधारीत आकृती बंधानुसार मंजुर पदे | रिक्त पदे | पात्र कर्मचारी संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 8 |
| 1 | अधिक्षक | 24 | प्रशासन अधिकारी (गट-ब) | 45 | 39 | 24 |
| 2 | वरिष्ठ लिपिक | 127 | वरिष्ठ सहाय्यक (गट-क) | 228 | 160 | 60 |
| 3. | गट-ड | 468 | पशुधन पर्यवेक्षक (गट-क) | 3772 | 3410 | 16 |
| 4. | गट-ड | 468 | लिपीक-टंकलेखक (गट-क) | 364 | 85 | 72 |

त्यानुसार पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभागाची पुनर्रचना व आकृतीबंधानुसार निरसीत करण्यात आलेल्या लिपीक संवर्गातील अधिक्षक व वरिष्ठ लिपीक या पदांवरील कार्यरत कर्मचा-यांना अतिरिक्त ठरवुन वित्त् विभागाचे दि.10/09/2001 च्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार कार्यवाही करणेबाबतच्या अट रदद करुन सदर पदांवर कार्यरत कर्मचा-यांना पशुसंवर्धन विभागात कार्यरत ठेवुन त्यांचे पात्रतनुसार अनुक्रमे प्रशासन अधिकारी (गट-ब), वरिष्ठ सहाय्यक (गट-क), लघुलेखक निम्नश्रेणा (गट-क ),लिपीक टंकलेखक (गट-क ) व पशुधन पर्यवेक्षक (गट-क) या पदांवर टप्प्याटप्प्याने पदोन्नती करण्यास मंजुरी प्रदान करण्यात यावी ही विनंती.

तरी आपले उचित कार्यवाहीसाठी सविनय सादर करण्यात येत आहे.

13.1.24

( डॉ.प्रविणकुमार देवरे, भा.प्र.से.)
आयुक्त पशुसंवर्धन,
महाराष्ट्र राज्य, पुणे-67